सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

दुरध्वनी क्र.०२१४१-२२२३६९

mdmraigad1@gmail.com "शिवतीर्थ", ३ रा मजला, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, जि. रायगड - ४०२ २०१

जा.क्र.राजिप/प्राथ.शिक्षण/आस्था-२३(अ)/ ९५१/२०२५ दिनांक :- ७/४/२०२५

प्रति,

प्राचार्य,
डेवीड इंग्लिश मिडियम स्कूल
ता.अलिबाग जि.रायगड

विषय :- दुबार सत्रामध्ये शाळा चालविण्यास परवानगी मिळणे बाबत.
संदर्भ :- आपले कडील पत्र जा.क्र.OT/DE/२४-२५-१६४३ दि.१६/०४/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, आपले शाळेचा दुबार सत्रामध्ये शाळा भरविण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५५.१ नुसार जागेची अडचण दुर करण्यासाठी दोन सत्रामध्ये भरविण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. प्रत्येक सत्राकरीता स्वतंत्र व पूर्णवेळ शिक्षकवर्ग असेल. एका सत्रात प्रती सप्ताह १७ ते १९ तास पुर्णवेळ अध्यापनाचे काम करणा-या शिक्षकांना दुस-या सत्रात प्रतिदिन दोन तासांपर्यंत अंशकालीन काम करण्याची परवानगी देता येईल.
२. शिकविण्याचे तास आठवडयातून २६ ते २७ असतील.
३. दोन्ही सत्रामध्ये शाळाप्रमुखाच्या सर्वसाधारण प्रशासनाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करतील.
४. शाळेने वर्षाच्या सुरवातीस दीर्घ सुट्टया धरुन शाळेला देण्यात येणा-या सर्व सुट्टयांची यादी प्राधिका-याकडे पाठवावी.
५. शासनाने जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टया दिल्या जातील.
६. रविवार व अर्ध्या सुट्टीचे दिवस वगळता मोठया सुट्टया धरुन सुट्टयांची संख्या ७६ दिवसाहून अधिक असणार नाही.

(पुनिता गुरव)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
रायगड जिल्हा परिषद अलिबाग